# विकासात अधिसभा सदस्यांची भूमिका प्रभावी

## शिवाजी विद्यापीठातील 'अधिसभेची कार्यप्रणाली' कार्यशाळेत उमटला सूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठाच्या विकासामध्ये अधिसभा सदस्यांची भूमिका प्रभावी असते. त्यांनी सर्व घटकांच्या विकासासाठी आग्रही राहायला हवे, असा सूर शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात अधिसभा सदस्यांसाठी आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत उमटला. शिवाजी विद्यापीठाच्या ॲकॅडमी ऑफ ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेशन (ए.ए.ए.) च्या वतीने अधिसभा सदस्यांसाठी 'अधिसभेची कार्यप्रणाली' या विषयावर कार्यशाळा झाली.



कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व अन्य.

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. ए. पी. कुलकर्णी म्हणाले, अधिसभा सदस्य हे एक प्रकारे विद्यापीठाच्या सर्वोच्च सभागृहाचे विश्वस्त असतात. त्यांनी आपले कार्य केवळ अधिसभेपुरते सीमित न करता वर्षभर विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कार्यरत राहिले पाहिजे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, अधिसभा सदस्यांनी आपली कार्यमर्यादा केवळ अधिसभेच्या बैठकीपुरती असल्याचे समजू नये. विविध प्रश्न मांडण्यासाठी अधिसभेच्या बैठकीची वाट न पाहता विद्यापीठाचे कुलगुरू अगर संबंधित विभागप्रमुखांशी आवश्यक पत्रव्यवहार केल्यास संबंधित प्रश्न मार्गी लागू शकतो.

अधिसभा सदस्यांच्या विविध शंकांचे समाधानही मान्यवरांनी केले. डॉ. ए. पी. कुलकर्णी, डॉ. राजेंद्र कांकरिया, डॉ. बी. एम. हिर्डेकर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले.

# भाताचा कोंडा, ऊसाच्या चिपाडापासून जैव इंधन

» आम्ही कोल्हापुरी

## डॉ. सचिन ओतारी यांचे संशोधन : कमी खर्चात जैव इंधनाची निर्मिती

**नंदिनी नरेवाडी - पाटोळे :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : सध्या उपलब्ध असणारी इंधने भविष्यात संपुष्टात येऊ शकतात. त्यासाठी पर्यायी इंधन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याबाबत जगभरात संशोधने केली जात आहेत. यात कोल्हापुरातील शुक्रवार पेठेतील एक तरुण आघाडीवर आहे. भाताचा कोंडा व उसाच्या चिपाडापासून बायोमिथेन, बायोइथेनॉल आणि बायोडिझेलची निर्मिती त्यांनी केली असून त्यांच्या या संशोधनामुळे भविष्यात इंधनाला जैविक पर्याय उपलब्ध झाला आहे. तसेच हे इंधन कमी खर्चात तयार करता येणार असून पुन्हा पुन्हा वापरण्यासाठी सोयीस्कर ठरणार आहे. यामध्ये संशोधन करणाऱ्याचे नाव आहे डॉ. सचिन विजय ओतारी.



**डॉ. सचिन ओतारी**

डॉ. सचिन ओतारी यांचे पदवीचे शिक्षण राजाराम महाविद्यालयातून सुक्ष्मजीवशास्त्र या विषयातून झाले. पुढे शिवाजी विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण घेतले. डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठात त्यांनी 'बायोलॉजिकल सिथेंसिस ऑफ सिल्वर नॅनो पार्टिकल फॉर बायोमेडिकल ॲपलिकेशन' या विषयावर पीएच.डी. संपादन केली. त्यानंतर त्यांना साऊथ कोरियातील कॉंकुक विद्यापीठात ब्रेनपुल फेलोशिप मिळाली. या फेलोशिपच्या माध्यमातून बायोइंधन निर्मितीबाबत संशोधन करण्याची संधी मिळाली. तेथे त्यांनी रिसर्च असिस्टंट प्रोफेसर म्हणून काम केले. या विषयावर त्यांचे ४३ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. नुकतेच त्यांना महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्स या संस्थेकडून यंग असोसिएटस म्हणून नामांकनही मिळाले होते. तसेच राष्ट्रीय स्तरावरील असोसिएशन ऑफ मायक्रोबायॉलॉजी या संस्थेकडून डॉ. जे. एस. भाट पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. तसेच त्यांना ३ कोरियन पेटंटही मिळाली आहेत.

### हायड्रोजलची निर्मिती

साऊथ कोरियामधून परत आल्यानंतर डॉ. ओतारी यांना विद्यापीठ अनुदान आयोगाची डॉ. डी. एस. कोठारी पोस्ट डॉक्टरल फेलोशीप मिळाली. सध्या ते शिवाजी विद्यापीठात हळदीतील करकुमीन या घटकांपासून काळ्या पडणाऱ्या त्वचेवर परिणामकारक अशा नॅनो पार्टिकल बेस्ड हायड्रोजलची निर्मिती करत आहेत.

# अधिसभा सदस्यांनी सर्व घटकांच्या विकासासाठी आग्रही राहणे गरजेचे

## कार्यशाळेत सूर : विद्यापीठात विविध विषयांवर मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यापीठाच्या विकासामध्ये अधिसभा सदस्यांची भूमिका प्रभावी असते. त्यांनी सर्व घटकांच्या विकासासाठी आग्रही राहायला हवे, असा सूर शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी अधिसभा सदस्यांसाठी आयोजित कार्यशाळेत उमटला.

विद्यापीठाच्या अकॅडमी ऑफ अकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेशन (एएए) च्या वतीने 'अधिसभेची कार्यप्रणाली' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. त्यामध्ये कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, माजी कुलसचिव डॉ. राजेंद्र कांकरिया, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी.एम. हिर्डेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. ए.पी. कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

संवादातून प्रश्न सोडविण्याची भूमिका सर्वच घटकांनी घेतल्यास अधिसभेमध्ये अधिक धोरणात्मक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी वेळ उपलब्ध होऊ शकेल, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. एस.टी. कोंबडे यांनी आभार मानले.

### मार्गदर्शक म्हणाले

- ए.पी. कुलकर्णी : सदस्यांनी आपले कार्य केवळ अधिसभेपुरते सीमित न करता वर्षभर विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कार्यरत राहिले पाहिजे. माजी विद्यार्थ्यांकडे ज्ञानाचे भांडार म्हणूनही पाहायला हवे.
- राजेंद्र कांकरिया : अधिसभेमध्ये सर्वच संबंधित घटकांचे प्रश्न मांडत असतो. तथापि, आपला सर्वाधिक भर हा विद्यार्थ्यांचे प्रश्न, समस्या सोडविण्याकडे असायला हवा. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने ज्या विविध समित्यांची, मंडळांची स्थापना करणे अपेक्षित आहे.
- बी. एम. हिर्डेकर : अधिसभा सदस्यांनी आपले प्रश्न वा प्रस्ताव नाकारले गेल्यास सभात्याग करण्यापेक्षा सभागृहात चर्चा घडवून आणण्यावर भर द्यावा. संबंधित प्रश्नी योग्य तोडगा अगर पर्याय काढण्याचा प्रयत्न करावा.

# कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील अडीच लाख विद्यार्थ्यांना दिलासा

## २९३ महाविद्यालयांतील वर्ग १५ फेब्रुवारीपासून भरणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महाविद्यालये सुरू करण्याबाबत आदेश बुधवारी काढला. त्यामुळे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील दोन लाख ५६ हजार २४२ विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला. शिवाजी विद्यापीठातील एकूण २९३ महाविद्यालयांतील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वर्ग शासन आदेशाचे पालन करून दि. १५ फेब्रुवारीपासून भरणार आहेत. त्याबाबत विद्यापीठात आज, सकाळी साडेअकरा वाजता डॉ. डी. जी. कणसे समितीची बैठक होणार आहे.

विद्यार्थी आणि त्यांच्या संघटनांकडून गेल्या तीन महिन्यांपासून महाविद्यालये सुरू करण्याबाबत वारंवार मागणी झाली. त्यावर विद्यापीठाने शासनाकडे मार्गदर्शन मागविले होते. त्याबाबतच्या कार्यवाहीसाठी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यांचा समावेश असणारी समिती गठित केली. ही समिती शासन आदेशानुसार महाविद्यालये सुरू करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करणार आहे. ही तत्त्वे, शासन आदेश विद्यापीठ विद्या परिषद आणि व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळांसमोर ठेवून त्यांची मान्यता घेऊन महाविद्यालये आणि विद्यापीठातील अधिविभागांमधील वर्ग भरविण्यात येणार आहेत. दरम्यान, योग्य ती प्रक्रिया राबवून आणि शासन आदेशाचे पालन करून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वर्ग भरविण्यात येतील. अधिकार मंडळांच्या मान्यतेची प्रक्रिया दि. १० फेब्रुवारीपर्यंत पूर्ण केली जाईल, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

### दुसऱ्या टप्प्यात वसतिगृहे सुरू करणार

कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील संस्थात्मक अलगीकरण कक्ष आणि कोविड केअर सेंटरसाठी शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील एक वसतिगृह आणि मुलांचे वसतिगृह क्रमांक एक, दोन आणि तीन जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात गेल्या अकरा महिन्यांपासून होती. ही वसतिगृहे प्रशासनाने विद्यापीठाच्या ताब्यात दिली आहेत. त्याबाबतचे पत्र प्राप्त झाले आहे. या वसतिगृहाचे निर्जंतुकीकरण करून महाविद्यालये सुरू झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी अखेरीस वसतिगृहे विद्यार्थ्यांसाठी सुरू केली जातील, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

### आकडेवारी दृष्टिक्षेप

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये : २९३

एकूण विद्यार्थी : २५६२४२

मुले : १२७४२८

मुली : १२१६६७